राज्यातील बिगर गॅस जोडणीधारकांना राज्य
शासनामार्फत गॅस जोडण्या वितरीत करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
## शासन निर्णय क्रमांकः रॉकेल-२०१९/प्र.क्र.३२/ना.पु.२७,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २४ जुलै, २०१९

**प्रस्तावना-**

मा.मंत्री (वित्त) महाराष्ट्र राज्य यांनी सन २०१९-२० या वर्षाच्या अर्थसंकल्पिय भाषणात "चूलमुक्त धूरमुक्त महाराष्ट्र" अशी घोषणा केली आहे. त्यांनी आपल्या भाषणात केलेली घोषणा खालीलप्रमाणे आहे:-

"भारतीय स्त्रीला धूरमुक्त वातावरणात जगता यावे यासाठी देशात उज्ज्वला योजनेच्या रुपाने मोठे अभियान राबविले जात आहे. त्याचा फायदा देशातील मोठ्या जनसमुहाला झाला. महाराष्ट्रात उज्ज्वला गॅस योजना, डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना व एलपीजी गॅस वितरणाच्या अन्य योजनांच्या लाभापासून जी कुटूंबे वंचित राहीली आहेत, अशा कुटूंबाना गॅस जोडणी उपलब्ध करून देण्याचा शासनाचा मानस आहे. राज्यातील मातृशक्तीला वंदन करुन येत्या आर्थिक वर्षात ही योजना पूर्ण करण्याचे नियोजित आहे. सदर योजना शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हे, नक्षलग्रस्त जिल्हे व आकांक्षित जिल्ह्यांमध्ये पथदर्शी प्रकल्प म्हणून राबविण्यात येईल. यासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात ₹१०० कोटी नियतव्यय राखून ठेवण्यात येत असून आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध केला जाईल."

मा. मंत्री (वित्त), महाराष्ट्र राज्य यांच्या उपरोक्त घोषणेस शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हे, नक्षलग्रस्त जिल्हे व आकांक्षित जिल्हयांना प्राधान्य देऊन राज्यातील सर्व जिल्हयात बिगर गॅसजोडणीधारकांना राज्य शासनामार्फत केंद्र व राज्य शासनाच्या प्रचलित योजनेत पात्र न ठरणाऱ्या कुटुंबांना गॅस जोडण्या वितरीत करण्याबाबत योजना राबविण्याचे शासनाच्या विचाराधिन होते.

## शासन निर्णय: -

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री उज्ज्वला योजना व विस्तारीत प्रधानमंत्री उज्ज्वला योजना-२ महाराष्ट्रातील पात्र कुटूंबाना शोधून त्यांना गॅस जोडणी देण्याचे काम विभागामार्फत तेल कंपन्यांच्या सहकार्याने युध्दपातळीवर सुरु आहे. महाराष्ट्रात एप्रिल, २०१९ पर्यंत प्रधानमंत्री उज्ज्वला योजना व विस्तारीत प्रधानमंत्री उज्ज्वला योजना-२ अंतर्गत ४०.६३ लक्ष कुटूंबांनी गॅस जोडणीचा लाभ घेतला आहे. तथापि, अद्यापही काही कुटूंबे गॅस जोडणीच्या लाभापासून वंचित आहेत. यातील सर्व पात्र कुटूंबाना शोधून त्यांना केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री उज्ज्वला योजना व विस्तारीत प्रधानमंत्री उज्ज्वला

योजना-२ मध्ये लाभ देण्याबाबत विभागाची कार्यवाही सुरु असली तरी, यातील काही कुटूंबे सदर योजनेसाठी पात्र होणार नाहीत. त्यासाठी राज्याची स्वतंत्र योजना सुरु करण्यात येत आहे.

**१. योजनेचे निकष :-**

१) जी शिधापत्रिकाधारक कुटूंबे प्रधानमंत्री उज्ज्वला योजना व विस्तारीत प्रधानमंत्री उज्ज्वला योजना-२ यांच्या उपरोक्त निकषांमध्ये पात्र ठरणार नाहीत अशा कुटूंबासाठी ही योजना लागू राहील, मात्र सदर कुटूंब राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचे लाभार्थी अथवा आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यातील राज्य शासनाच्या शेतकरी योजनेचे लाभार्थी असणे आवश्यक राहील.

२) सदरची गॅस जोडणी ही कुटूंबातील कुटूंबप्रमुख प्रौढ स्त्रीच्या नावाने मंजूर करण्यात येईल.

३) एक शिधापत्रिकाधारक कुटूंब एकच गॅस जोडणी मिळण्यास पात्र राहील.

**१. योजनेची कार्यपध्दती :-**

विभागामार्फत गॅसधारक शिधापत्रिका व बिगर गॅसधारक शिधापत्रिका यांची माहिती तयार करण्यात आली असून ती NIC मार्फत आधारकार्डशी जोडण्यात आलेली आहे. सदर माहिती ही जिल्हाधिकारी यांना दुकाननिहाय पाठविण्यात आली आहे. जिल्हाधिकारी सदरची माहिती अधिकृत शिधावाटप दुकानदारांना पाठवतील.

तसेच जिल्हास्तरावरील तेल कंपनीचा नियुक्त अधिका-याच्या सहकार्याने गॅस एजन्सी व त्यांना जोडण्यात येणारे शिधावाटप दुकाने यांची यादी तयार करेल. तसेच शिधावाटप दुकानात नवीन गॅसजोडणीचे अर्ज दिले जातील. शिधापत्रिकाधारक अधिकृत शिधावाटप दुकानामध्ये ज्यावेळी केरोसिन घेण्यासाठी येतील त्यावेळी त्यांच्याकडून दुकानदारामार्फत गॅस जोडणीचा फॉर्म भरुन घेण्यात येईल. तथापि, शिधापत्रिकाधारक केरोसिन घेण्यास न आल्यास शासनाकडून देण्यात आलेल्या यादीच्या आधारे शिधापत्रिकाधारकाकडून गॅस जोडणीचा फॉर्म भरुन घेण्यात येईल.

जी कुटूंबे प्रधानमंत्री उज्ज्वला योजना व विस्तारीत प्रधानमंत्री उज्ज्वला योजना-२ अंतर्गत पात्र ठरतील त्यांना केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत गॅस जोडणी दिली जाईल. उर्वरित शिधापत्रिकाधारक कुटूंबांना राज्याच्या योजनेतून गॅस जोडण्या देण्यात येतील. बहुतांश शिधापत्रिकाधारक कुटूंबे प्रधानमंत्री उज्ज्वला योजना व विस्तारीत प्रधानमंत्री उज्ज्वला योजना-२ अंतर्गत पात्र ठरतील.

राज्यात सद्यस्थितीत ५२,००० रास्तभाव दुकाने कार्यरत असून २१२२ इतक्या गॅस एजन्सी कार्यरत आहेत. त्यानुसार साधारणत: एका गॅस एजन्सीकडे २५ रास्तभाव दुकानदार नेमण्यात येतील. तसेच लाभार्थ्यांकडून खालील कागदपत्रांच्या छायांकित प्रती घेण्यात येतील :-

१) शिधापत्रिका,

२) कुटूंबप्रमुख स्त्री व कुटूंबातील इतर व्यक्तींचे आधारकार्ड,

३) लाभार्थ्यांचा (कुटूंबप्रमुख स्त्री) बँकेचा तपशील

अर्जदाराचे अर्ज व उपरोक्त कागदपत्रे जमा करुन शिधावाटप दुकानदारांमार्फत संबंधित गॅस एजन्सीला दिली जातील व गॅस एजन्सी ज्यांची कागदपत्रे परिपूर्ण असतील अशा शिधापत्रिकाधारक कुटूंबांना तात्काळ गॅस जोडणी मंजूर करतील.

सर्व प्रथम शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हे, नक्षलग्रस्त जिल्हे व आकांक्षित जिल्ह्यांना प्राधान्य देऊन सदर जिल्हयांमधील गरीब कुटूंबांना गॅस जोडण्या मंजूर करण्यात येतील व त्याचप्रमाणे उर्वरित जिल्हयांमध्ये सदर योजना राबविण्यात येईल.

**२. राज्य शासनाने उचलावयाचा खर्च :-**

प्रधानमंत्री उज्ज्वला योजना व विस्तारीत प्रधानमंत्री उज्ज्वला योजना-२ अंतर्गत पात्र न ठरणा-या शिधापत्रिकाधारकांना एक गॅस जोडणी मंजूर करण्यासाठी पुढीलप्रमाणे एकूण ₹३८४६/- इतका खर्च येतो:-

| Sr. No | Description | Cost |
|---|---|---|
| १ | Deposit towards LPG Cylinder | १४५० |
| २ | Deposit towards Regulator | १५० |
| ३ | Suraksha Hose | १९० |
| ४ | Cost of Blue Card | ५९ |
| ५ | Admin Charges | ८८.५० |
| ६ | Gas Stove (२ Burner) | ९९० |
| ७ | Refill Cost of १४.२ kg cylinder | ७०० |
| ८ | Stamp Duty | १०० |
| ९ | Installation | ११८ |
| | **Total** | ३८४६ |

उपरोक्त प्रमाणे एका गॅस जोडणीसाठी ₹३८४६/- इतका खर्च येईल. राज्यात सद्यस्थितीत ४१,२०,६३४ कुटूंबे बिगर गॅसजोडणीधारक असली तरी त्यापैकी बहुतांश कुटूंबांना चालू वर्षात प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत गॅस जोडण्या वितरित करण्यात येतील. त्यामुळे बिगर गॅसजोडणीधारक कुटूंबांच्या संख्येत पुन्हा मोठी घट होईल.

सदर योजनेंतर्गत ज्या कुटूंबांना गॅस जोडण्या मंजूर करावयाच्या आहेत ती कुटूंबे प्रधानमंत्री उज्ज्वला योजना व विस्तारीत प्रधानमंत्री उज्ज्वला योजना-२ मध्ये पात्र ठरत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र तेल कंपन्यांकडून शासनास सादर करण्यात येईल. त्याच प्रमाणे तेल कंपन्यांनी उपयोगिता प्रमाणपत्र दिल्यानंतर व विभागामार्फत पडताळणी करुनच टप्याटप्याने निधी वितरीत करण्यात येईल.

याबाबत प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, विस्तारीत प्रधानमंत्री उज्ज्वला योजना-२ व "चूलमुक्त महाराष्ट्र, धूरमुक्त महाराष्ट्र" करण्यासाठी केंद्र शासनाच्या योजनेंतील निकषात न बसणा-या कुटूंबांचा आढावा घेण्यात येईल. दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत महाराष्ट्रातील सर्व कुटूंबाना गॅस जोडणी देऊन "चूलमुक्त महाराष्ट्र, धूरमुक्त महाराष्ट्र" करण्याचा विभागाचा मानस आहे.

**३. संनियंत्रण समिती :-**

सदर योजनेसाठी राज्यस्तरावर खालीलप्रमाणे संनियंत्रण समिती राहील:-

१) प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग- अध्यक्ष,

२) राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य- सचिव,

३) इंडीयन ऑईल लि.चा एक प्रतिनिधी

४) भारत पेट्रोलियम लि.चा एक प्रतिनिधी

५) हिंदुस्थान पेट्रोलियम लि.चा एक प्रतिनिधी

६) राज्यस्तरीय गॅस असोशिएशनचा एक प्रतिनिधी

तसेच, जिल्हास्तरावर खालीलप्रमाणे संनियंत्रण समिती राहील:-

१) जिल्हाधिकारी, अध्यक्ष

२) जिल्हा पुरवठा अधिकारी, सचिव

३) तेल कंपनीचा जिल्हास्तरावरील एक प्रतिनिधी

४) जिल्हास्तरीय गॅस असोसिएशनचा एक प्रतिनिधी

उपरोक्त समित्यांमार्फत दरमहा सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबतचा आढावा घेण्यात येईल.

३.  सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२४१३५८०१२७०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MAHESH PATHAK

Digitally signed by MAHESH PATHAK
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=e9535c95dc1a6714290a6a1e084b3bb4cc266f737f88ea4b79e3f83c4a7ca12d, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=89b136784be463271bbba2095dbd148bf1e0f6a85adaff8cf4665692d20f2e76, ou=FOOD CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=MAHESH PATHAK
Date: 2019.07.24 14:05:09 +05'30'

**( महेश पाठक )**
**प्रधान सचिव**
**अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

**प्रत,**

१. सर्व मा.विधानसभा सदस्य,
२. सर्व मा.विधान परिषद सदस्य,
३. सर्व विभागीय आयुक्त,
४. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व उपनगर वगळून),
५. नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा मुंबई,
६. सर्व उप आयुक्त (पुरवठा),
७. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी,
८. सर्व अन्न धान्य वितरण अधिकारी,
९. राज्य स्तरीय समन्वयक, तेलउद्योग महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१०. महाव्यवस्थापक, इंडियन ऑईल कॉर्पो. लि., मुंबई
११. महाव्यवस्थापक, भारत पेट्रोलियम कॉर्पो. लि., मुंबई
१२. महाव्यवस्थापक, हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पो. लि., मुंबई
१३. मा.मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव,
१४. मा.राज्यमंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव,
१५. निवडनस्ती.